# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ११/०५/२०१८ चे गुन्हे आढावा

| अ. क्र | पोलीस ठाणे | गु र नं कलम | गु घ ता वेळ ठिकाण | गु दा ता वेळ | फिर्यादी | आरोपी | अटक ता. वेळ | गेलेला माल | मिळा लेला माल | घ.भेटी चा दि. व अधि | तपास | खुलासा | I Bike ने भेट दिली किंवा नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्रांती चौक | 167/18 कलम 323, 354 भादवि | 10/05/18 रोजी10.00 वा.सु. | 10/5/18 रोजी 16.03वा .सु. | महिला फिर्यादी वय 31वर्षे रा. औरंगाबाद. | राजु भरतु चव्हाण | | | | | सफौ/ देश मुख मो.नं. 9923 2473 33यां चेकडे दिले | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ह्या घराजवळ असताना यातील आरोपी याने फिर्यादीशी वाद घालुन फिर्यादीचा डावा हात धरुन हाताचापटाने मारहाण करुन फिर्यादीस जवळ ओढुन घेवुन फिर्यादीचे मनास लज्जा वाटेल असे कृत्य करुन फिर्यादीचा विनयभंग केला आहे त्याचेवर कायदेशिर कारवाई करावी.वगैरे मजकुराच्या जबाबावरुन गुन्हा दाखल | |
| २ | क्रांती चौक | 168/18 कलम 324, 323, 504, 506,34 भादवी | 10/05/18 रोजी 16.30वा. सु. गांधीनगर औरंगाबाद | 10/5/18 रोजी 21.30 वा.सु. | किरण ईश्वर लाहोट वय33वर्षे रा.हर्षनगर लेबर कॉंलनी औरंगाबाद | 1)राजु भरतु चव्हाण 2) दिपक रामकुमार चव्हाण 3) महिला आरोपी 4)भरतु चव्हाण | | | | | सफौ/ देशमु ख मो.नं. 9923 2473 33 | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे अपसात नातेवाईक असुन यातील फिर्यादीचे बहीणीने पोलीसात तक्रार दिल्यानंतर फिर्यादी त्यांचे बहिणी सोबत तीचे मुलांना घेण्यासाठी नमुद ठिकाणी गेले असता यातील फिर्यादीने पोलीसात तक्रार दिल्याच्या कारणावरुन आरोपीतांनी फिर्यादीशी वाद घालुन शिविगाळ करुन यातील आरोपी क्र.1व 2 यांनी लाठ्या काठ्यानी फिर्यादी व फिर्यादीची बहिण हिस मारहाण करुन जखमी केले व आरोपी क्र.3 व 4यांनी देखील फिर्यादी व फिर्यादीच्या बहीणीस लाथाबुक्क्यानी मारहाण केली व आंमचे विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली तर जिवानिशी मारुन टाकु अशी धमकी दिली वगैरे मजकुराच्या जबाबावरुन गुन्हा दाखल | |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ११/०५/२०१८ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सातारा | 162/18 कलम 392 भादवि | 10/05/18 रोजी 19.30 to 19.45 वा. सु. चंद्रशेखर नगर सातारा परिसर | 10/5/18 रोजी 21.39 वा | महिला फिर्यादी वय 30वर्ष रा.डोंगरकीनी, ता.पाटोदा जि.बीड. | एक अनओळखी ईसम | | 30,00/- रुपये किंमतीचे अंदाजे 1.5तोळा वजनाचे सोन्याचे मीनी गंठण | | | सफौ ब-हाटे | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादीची आई असे सोबत चंद्रशेखर नगर येथील स्वामी समर्थ केंद्र येथुन त्यांच्या भावाच्या घरी पायी जात असताना वरिल अनओळखी मोटार सायकलस्वाराने पाठीमागुन येऊन फिर्यादी बाईच्या गळयातील वरिल वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे मिनी गंठण बळजबरीने हिसाकाऊन चोरुन घेऊन पळुन गेला आहे म्हणुन गुन्हा दाखल | |
| ४ | सातारा | 163/18 कलम 374 भादवि सह कलम 75 व 79 ज्युविनाइल जस्टीस कायदा 2015 | 10/05/18 रोजी 20.45 वा.सु बॉम्बे चायनिज तवा स्पॉट रेणुकामाता मंदिर कमानी जवळ बीडबाय पास रोड औरंगाबाद | 10/5/18 रोजी 23.14 वा | गोविंद आसाराम गावंडे वय 43 वर्ष धंदा नोकरी (सुविधाकार) रा. एन 9 ,संत ज्ञानेश्वर नगर सिडको औरंगाबाद | सादिक शब्बीर खान वय 37 वर्ष रा. आयेशा मस्जीद जवळ शहानुरवाडी दर्गा औरंगाबाद | | | | | पोह 1991 चव्हाण | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने सरकारतर्फे फिर्याद दिली की बाल व किशोरवयीन कामगारांना कामावर ठेवणे कायदयाने गुन्हा आहे कृतीदला मार्फत वरील हॉटेलवर धाड टाकली असता बालकामगार /किशोरवयीन कामगार काम करतांना आढळुन आले म्हणुन गुन्हा दाखल | |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ११/०५/२०१८  चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | पुंडलिक नगर | 104/18 कलम 454, 457, 380 भादवी | 05/05/18 रोजी सकाळी 11.30 वाजे पासुन ते दि.09/05/18 रोजी रात्री 11.30 वाजे दरम्यान N 3 सिडको विद्याधन कॉलेजच्या बाजुला औ.बाद | 10/5/18 रोजी १७.३० वाजता | संजय कोंडीबा नागरे वय 53 वर्षे रा.N 3 सिडको विद्याधन कॉलेजच्या बाजुला औ.बाद | अज्ञात | | | | मपोउपनि / फासाटे | पोउपनि / सय्यद सिध्दीक | यातील फिर्यादी हे त्यांचे घराचे सर्व दरवाजा ,खिडक्या लावुन बाहेरगावी कुटुंबासह फिरायला गेले असता घरी आल्यानंतर पाहीले असता त्यांचे घराचे बेडरुम मधील खिडकीचे ग्रील तोडुन आत प्रवेश करुन कपाटामधील व ड्रावरचे लॉक तोडुन आतले वरील किंमतीचे सोन्या चांदीचे दागीने व रोख रक्कम व डायमंडचे नेकलेस कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले म्हणुन गुन्हा दाखल<br>**गेला माल-**<br>3,32,000/ रु.किमतीचे एक प्लॅटिनीक ब्रासलेट त्या मधे डायमड असलेले जुवाकिअ.<br>1,00,000/ रु.किमतीचे चार तोळयाचे सोन्याचे नाणे गोल आकाराचे चार नग<br>6,0000 रु किमतीच्या चार सोन्याच्या अंगठ्या प्रतेकी दोन पाच ग्रॅम व एक सात ग्रॅम<br>120,000/ रु. किमतीची एक सोन्याची अंगठी त्या मधे हिरवा खडा असलेली जुवाकीअ.<br>10,6000/ रु.किमतीची सोन्याची अंगठी एक डायमंडची व एका अंगठीवर आकाश लिहीलेले<br>150,000/रु किमतीचे तिन मंगळसुत्र पोत सोन्याची पदकासह 6 तोळयाचे जुवकिअ.<br>40,000/रु.कि.चे 9 ग्रॅम सोन्याचे कानातील फुले व झुंबर 7 ग्रॅम पत्यासह सोन्यचे दागीने.<br>40,000/-रु.किचे सोन्याचे ओम दिड तोळयाचे<br>1,00,000/ रु.चे नाकामधील नथ डायमंड वसोन्याचे<br>75,000 / रु किमतीचे दोन सोन्याचे लॉकेट दोन कानातील जोड एक एक तोळयाचे<br>2,00,000/रु चे एक सोन्याची डायमंड नेकलेस<br>60,000/ रु चे दोन तोळयाचे सोन्याचे ब्रासलेट<br>60,000/ रु किमतीचे चांदीचे नाणे एकुन 17 अंदाजे 250,300,600 ग्रॅम असलेले.<br>3,00,000/ रु किमताच्या एकुण 12 अंगठ्या<br>85,000/ रु .रोख रक्कम ज्यात<br>एकुण**- 18,28,000 /-** | --- |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ११/०५/२०१८ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | सिडको | 148/18 कलम 294(B) IPC | 09/05/18 रोजी 19.30 वा. सुमारास, राहते घरी एन11, हडको, औरंगाबाद | 10/5/18 रोजी 11.54 | महिला फिर्यादी वय 26 वर्ष रा. एन11, हडको, औरंगाबाद. | मो.क्र. चा धारक नामे चंद्रकात रतन पुरी वय अंदाजे 35 वर्ष रा. पुंडलीक नगर रोड, औरंगाबाद ह.मु.नवसारी (गुजरात राज्य ) | | | | | पोह/ 681 बिरारे | वरील ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीने फिर्यादीच्या पतीचा मो.क्र. वर त्याचा मो.क्र. वरुन फोन करुन फिर्यादीचे सासरे यांना व ननंद हिस वाईट- शिविगाळ केली .तसेच फिर्यादीचे पतीने समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यासपण अश्लिल शिविगाळ करुन फिर्यादीसही अश्लिल शिविगाळ केली म्हणुन गुन्हा दाखल. | |
| ७ | सिटि चौक | १२५/१८ कलम ४२०, ४०६, ३४ भादंवी | दि.४.७.१६ रोजी १२.०० वा. ते दि १०.७.२० १६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय औबाद | १०.५. २०१८ रोजी १५.३७ वा. | रामेश्वर रमेश खरात वय २८ वर्षे रा. करणखेड, पोस्ट कव्हळा, ता. चिखली, जिल्हा बुलढाणा. | १.मधुकर विनायक गायकवाड, रा. आडूळ, ता.पैठण २.साहेबराव प्रताप राठोड, रा. सुंदरवाडी, ता.पैठण, 3) बाळासाहेब बन्सी डोईफोडे, रा. नारळा, पैठण, ता. पैठण, 4) अंबादास रामभाऊ ससाणे, रा. शहर टाकळी, ता. शेवगांव, जि . अहमदनगर | - | - | | | पोह/ २२३ १ सैय्यद मुजीब | नमुद ता.वे.व ठिकाणी यांतील फिर्यादी यास आरोपीतांनी नोकरी लावण्याचे अमिष दाखवून व विश्वासात घेऊन फिर्यादी यांचे कडून 7,00,000/- रुपये घेतले व फिर्यादीस नोकरी न लावता व पैसे परत न करता संगणमताने विश्वासघात करुन फसवणुक केली म्हणून गुन्हा. | |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ११/०५/२०१८ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | सिटि चौक | १२६/१८ कलम ३७९ भादवी | १९/४/१८ रोजी २३.०० वा.ते २०/४/१८ रोजी ०६.०० वा. | १०/५/१८ रकोजी २३.०६ वा. | शेख फईम शेख बाबु रा. किराडपुरा औरंगाबाद | अज्ञात | | फळाची हातगाडी किं. ७००० -/ रुपये कि. अं. | | | पोहेकाँ ६२८ लईक | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादि याने वरील वर्णनाची व किंमतीची हातगाडी ही दिनांक 19/4/18 रोजी 23.00 ते दिनांक 20/4/18 रोजी 23.00 ते दि 20/4/18रोजी 06.00 वा. दरम्यान कोणी तरी अज्ञात चोरटयाने स्वत:च्या फायदयासाठी चोरुन नेली आहे. तरी माझ्या हातगाडीचा व अज्ञात चोरटयाचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी म्हणुन गुन्हा दाखल. | |
| ९ | मुकूंद वाडी | १२९/१८ कलम ३२४, ५०४ भादवि | १०/५/१८ वेळ ०८.०० वा. | १०/०५/२०१८ वेळ २०.३७ वा. | महिला फिर्यादी वय 55 वर्षे रा.अंबेडकर नगर औरंगाबाद | मिलींद पिराजी कांबळे | निरंक | | | | पोना/४४८ मुळे ९९२३४९५५११ | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी कळविले की,दि. 08/05/2018 रोजी मी माझी लहान मुलगी हिचे पती माझ्या मुलीस दारू पिऊन मारहाण करत असल्याबाबत मला समजले त्यामुळे मी त्यांच्याकडे माझ्या जावई यांना समजावण्यासाठी आले होते. दि. 10/05/2018 रोजी सकाळी 08.00 वा सू माझ्या मुलीस माझा जावई मिलींद पिराजी कांबळे हा संशय घेऊन मारहाण करत असल्याने मी त्यांना सोडवत असतांना त्याने मला रागात येऊन शिवीगाळ करून माझ्या डोक्यात दगडी वरवंटा मारला असल्याने जखम होऊन रक्त निघाले आहे म्हणुन गुन्हा दाखल. | |
| १० | जवाहर नगर | 77/18 कलम 379 भा.द.वि. | 15/1/18 रोजी 14.00 ते 14.45 वा. डी मार्ट समोर, औरंगाबाद | 10/5/18 रोजी 13.10 वा. | संदिप तुळशीराम गायकवाड, वय 39 वर्षे, रा. नागसेन नगर, उस्मानपुरा, औरंगाबाद | अज्ञात | -- | 25,000/ रू.किं.ची स्प्लेंडर प्लस कंची मो.सा.क्र. MH-20-BS 1039 | -- | | HC/2289 हिवाळे, मो.नं. 9158407709 | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील अज्ञात आरोपीताने फिर्यादीची वरील नमुद वर्णनाची, किंमतीची व कंपनीची हँडल लॉक केलेली मो.सा. स्वतःच्या फायद्यासाठी लबाडीच्या इराद्याने चोरून नेली म्हणुन बाजुस कलमा प्रमाणे गुन्हा दाखल. | |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ११/०५/२०१८ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | वाळुज | ७६/१८ कलम ३२६,३२३, ५०४,५०६ ,३४ भादवी | १०/०५/१८ चे १०.०० वा. सु.नांद्राबाद वाळुज ,ता. गंगापुर | १०/०५/ २०१८ चे २१.२५ वा. सु. | निजाम जमाल सय्यद वय ५२ वर्ष रा नांद्राबाद | १)अफरोज हसन पठाण २) शेख राजु रा अमळनेर ३) अफरोज यांचा अनोळखी नातेवाईक | -- | | | | पोना/ २४१० खंडाग ळे | नमद वेळी व ठिकाणी सदर फिर्यादिचे घरी सदर आरोपीतांनी त्यास व पत्नीस शिवीगाळ करुन लाथाबुक्क्याने मारहान करुन लाकडी ब्याटने मारुन फिर्यादीचे पत्नीस गंभीर जखमी केले करिता गुन्हा दाखल | |
| १२ | वाळुज | ७७/१८ कलम ३२४,५०४, ५०६,३४ भादवी | १०/०५/१८ चे १४.०० वा. सु बाफना मोटर्स वाळुज ,ता. गंगापुर | १०/०५/ २०१८ चे २३.१९ | रविंद्रकुमार श्रीकांत मोर्या वय ३० वर्ष रा एस. क्लब औरंगाबाद | १)नंदु साबळे २)गणेश साबळे ३)विक्रम साबळे सर्व रा. नविन शिवराई ता गंगापुर | | | | | पोह/ २२२४ पंडाग ळे | नमुद वेळी व ठिकाणी सदर फिर्यादीस सदर आरोपीतांनी किरकोळ कारणावरुन वाद घालुन शिवीगाळ करुन लाथाबुक्क्याने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिली तसेच वरील सर्व दारु पिलेले असल्याने त्यांनी सदर फिर्यादीस केस धरुन भिंतीस हाणले त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटुन रक्त गळु लागले करिता गुन्हा दाखल | |
| १३ | एम. वाळुज | 136/218 कलम- 341,323, 504,506, 34 भा.द.वी | 06/05/18 वेळ-13.00 ते 13.30 वा अयोध्या नगर बजाज नगर एम वाळुज ता जि औबाद | 10/5/18 रोजी 19.10 | अभिषेक भुजंग इद्रोळे वय 18 वर्ष रा.आयोध्या नगर, औरंगाबाद | 1) हेमंत पुड 2) अजय जाधव | | | | | पोना/ 277 शेवगे | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील यातील फिर्यादि हे घरी जात असताना यातील आरोपीतानी संगणमत करून फिर्यादिच्या रस्ता अडवुन तु घरी कसा जातो असे म्हणुन शिवीगाळ करून हाताचापटाने मारहाण केली तेव्हा फिर्यादिची आई समजावण्यास गेली असता त्याना सुध्दा शिवीगाळ केली म्हणुन गुन्हा. | |

**स्वाक्षरीत/-**
**(रामेश्वर थोरात)**
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर.